# मुंबई विद्यापीठ

वेब साईट :www.mu.ac.in
ई-मेल :dr.estab@fort.mu.ac.in

मानव संसाधन विकास कक्ष
एम्.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२
दूरध्वना : ०२२-६८३२००९३/९४


---

परिपत्रक

क्र. मासविक/आयसीडी/२०२१-२२/२

संदर्भ :- शासन निर्णय, क्र. संकीर्ण-११२१/प्र.क्र.८७/१६-अ, दि. ७ मे, २०२१

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालये प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक , रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कुल ऑफ इंजिनिअरिंग अँड ॲप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र संकीर्ण-११२१/प्र.क्र.८७/१६-अ, दि. ७ मे, २०२१ अन्वये राज्यातील कोरोना आपत्तीची गंभीर परिस्थिती लक्षात घेता विद्यापीठातील “अ” वर्ग अधिकारी यांच्या वेतनातून दोन दिवस व गट “ब”, गट “क” व गट “ड” यांच्या वेतनातून एक दिवसाचे वेतन माहे मे-२०२१ च्या वेतनामधून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबतचे आवाहन करण्यात आलेले आहे. ज्या अधिकारी / कर्मचा-यांची माहे मे- २०२१ च्या वेतनातून रक्कम वसूल करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र दि. २० मे, २०२१ पर्यंत प्राधान्याने वित्त व लेखा विभाग (वेतन कक्ष) यांना लेखी कळवावे. सदर बाब संबंधित शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

शासन परिपत्रक दि. ७ मे, २०२१ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (www.mu.ac.in)

डॉ. बळीराम गायकवाड
(प्रभारी कुलसचिव)

मुंबई -४०० ०३२
दि. १४ मे, २०२१

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभागप्रमुख,

(अ)प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत
१. प्रभारी वित्त व लेखा अधिकारी

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषीत
१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफीसर्स व
२. वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना

डॉ. बळीराम गायकवाड
(प्रभारी कुलसचिव)

राज्यातील कोरोना आपत्ती निवारणाच्या उपाययोजनांकरिता राज्यातील सर्व भा.प्र.से, भा.पो.से, भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासकीय/ निमशासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या माहे मे, २०२१ च्या वेतनातील एक/ दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत ..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-११२१/प्र.क्र.८७/१६-अ,
मंत्रालय विस्तार इमारत, ४ था मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ७ मे, २०२१

प्रस्तावना

कोरोना आपत्तीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव झालेला असून अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्य शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महसूल विभाग, गृह विभाग तसेच अन्य संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी कोरोना आपत्तीच्या निवारणासाठी प्रभावी उपाययोजना करीत आहेत. यासाठी सर्व स्तरातून मदतीचा ओघ सुरू आहे. या आपत्तीच्या दुर्धर प्रसंगी राज्यातील कोरोना बाधितांवर उपचारांसाठी तसेच कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी सहाय्य करण्यासाठी राज्यातील विविध अधिकारी व कर्मचारी संघटना / महासंघ यांनी कर्तव्यबुद्धीने एक/दोन दिवसांचा पगार या मदतकार्यासाठी परस्पर कापून घेण्याबाबतचे निवेदन शासनास सादर केलेले आहे.

परिपत्रक -

कोरोना आपत्तीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव झाल्यामुळे गंभीर परिस्थिती उद्भवलेली असून, या आपत्तीस सामोरे जाण्यासाठी सहाय्य व मदत व पुनर्वसनाच्या कामास आपलाही हातभार लागावा म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., भा.व.से. व राज्य शासकीय/निमशासकीय गट-अ व गट-ब चे राजपत्रित अधिकारी यांनी माहे मे, २०२१ च्या आपल्या वेतनातील प्रत्येकी दोन दिवसांचे तसेच राज्यातील गट ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड चे कर्मचारी यांनी प्रत्येकी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच सेवानिवृत्त राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून देखील दोन दिवसांचे निवृत्तीवेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

२. राज्य शासनातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, मंडळे तसेच सर्व स्वायत्त संस्थेचे विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील/कार्यालयातील सर्व अधिकारी/

Scanned with CamScanner

कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांना प्रश्नाचे गांभीर्य समजावून सांगावे. तसेच एक/दोन दिवसांच्या वेतन कपातीस त्यांची हरकत असल्यास आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखास लेखी कळवावे.

३. शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पगारातून एक/दोन दिवसाचे वेतन (माहे मे २०२१) कपातीसाठी व ती रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्यासाठी व त्याचा हिशोब सादर करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा:-

(एक) माहे मे, २०२१ या महिन्याचे वेतन देयके शासनाच्या सूचनेनुसार काढण्यात यावे. तथापि वेतनातील नियमित वजातीनंतर व एक / दोन दिवसाच्या वेतनाच्या वजातीनंतर वेतनाची उर्वरीत रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना धनादेश/रोखीने/विहित पद्धतीने अदा करण्यात यावी.

सध्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन त्यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेल्या त्यांच्या बँक खात्याच्या तपशिलानुसार खात्यावर परस्पर जमा करण्यात येते अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातील नियमित वजातीनंतर उर्वरित वेतनाची रक्कम संबंधित बँकेकडे जमा करण्यापूर्वी सदर रकमेतून मे २०२१ मधील वेतनातून एक / दोन दिवसाचे वेतन कमी करुन शिल्लक रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे कळविण्यात यावे.

(दोन) सदर एक / दोन दिवसाचे वेतन कपात करताना ते मूळ वेतन + महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे.

(तीन) वेतन वितरणाच्या वेळी वरीलप्रमाणे वसुली करुन वसूल केलेल्या रकमेची नोंद घेण्यासाठी (माहे मे २०२१ करिता) एक स्वतंत्र नोंदवही ठेऊन त्यामध्ये वसूल केलेल्या रकमांची नोंद अधिकारी / कर्मचारी निहाय घेण्यात यावी.

(चार) अशा प्रकारे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एकत्रित होणारी रक्कम विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख तसेच जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी/मुख्य अधिकारी, नगरपरिषद/नगरपालिका, आयुक्त, महानगरपालिका यांनी मुख्यमंत्री सहायता निधी यांची वेबसाईट www.cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भरणा करून त्या ठिकाणी तयार होणाऱ्या पोचपावतीची प्रत मुद्रीत करून घ्यावी किंवा खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्यात परस्पर जमा करावी व त्याची पोचपावती, गोळा केलेल्या रकमेच्या देणगीदारांच्या यादीसह दोन प्रतीत परस्पर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा माळा, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे निश्चित प्राप्त होईल अशा प्रकारे रकमेचा भरणा केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत अचूक पाठवावी.

मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्याचा तपशील-

| | |
|---|---|
| "मुख्यमंत्री सहायता निधी - कोविड १९<br>बचत खाते क्रमांक ३९२३९५९१७२०<br>स्टेट बँक ऑफ इंडिया,<br>मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई-४०० ००१.<br>शाखा कोड-००३००,<br>IFS Code - SBIN०००३०० | Chief Miniter's Relief Fund - Covid 19<br>Saving Account No. 39239591720<br>State Bank of India<br>Mumbai Main Branch,<br>Fort, Mumbai-400 001.<br>Br.Code- 00300,<br>IFS Code - SBIN0000300 |



Scanned with CamScanner

(टिप :- मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडून बँक खात्यात जमा होणाऱ्या देणगी रकमांबाबत नोंद घेणे, इ. कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग / कार्या. १६-अ कडे सदर धनादेश/धनाकर्ष, देणगीदारांची यादी, इ. माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.)

(पाच) शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन वाटप करतांना त्यांच्याकडून वसूल करावयाच्या वेतनाइतक्या रकमेचे प्रमाणपत्र तयार ठेवण्यात यावे. सदर प्रमाणपत्र विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख अथवा संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संबंधितांना देण्यात यावे. त्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीतून परत वेगळया व्यक्तिगत पावतीची व प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही. वेतन वाटप करीत असतानाच या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र त्यांना देण्यात यावे.

(सहा) बृहन्मुंबईतील मंत्रालयीन विभाग व अन्य विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख इत्यादींनी गोळा केलेल्या निधीचा धनादेश, देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) परस्पर मुख्यमंत्री सचिवालयातील सहायता निधी कक्ष यांच्याकडे समक्ष पाठवून त्याबद्दलची पोचपावती घ्यावी.

(सात) जिल्हा स्तरावर जनतेकडून व विविध संस्थांकडून जमा होणारी रक्कम विभाग/कार्यालय प्रमुखांनी संबंधित देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडे धनादेशाव्दारे जमा झालेली रक्कम उपरोक्त सूचना क्रमांक (चार) मध्ये नमूद बँक खात्यात जमा करुन त्या संबंधातील पोचपावती व तपशिलासह मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे उपरोक्त पत्त्यावर पाठवावी.

रोखीने प्राप्त झालेल्या रकमेच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यालयनिहाय यादी तयार करुन एकूण रकमेचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये उपरोक्त अ.क्र. (चार) मध्ये नमूद कार्यपद्धतीप्रमाणेच जमा करुन त्याबाबत परिशिष्ट "अ" प्रमाणे प्रमाणपत्र संबंधितांना द्यावे व अशा प्रकारे प्राप्त निधीच्या तपशीलासह माहिती नमुना "ब" व "क" मध्ये मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे पाठवावी. अशा रकमेचा भरणा दर आठवडयाला अथवा ठराविक काळामध्ये करावा. तोपर्यंत ही रक्कम सोयीकरिता जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांच्याकडील मुख्यमंत्री निधीच्या स्टेट बँकेकडील बचत खात्यात सुरक्षित ठेवायला हरकत नाही. मात्र त्याचा हिशोब वेगळा ठेवावा.

(आठ) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची मासिक वेतनातून रक्कम वसूल करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यांकडे द्यावे.

(नऊ) एक / दोन दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रकमेपेक्षा कमी रक्कम कापून घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

(दहा) अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहे मे-२०२१ च्या वेतनातून रक्कम वसूल करण्यात येईल याबाबत संबंधित मंत्रालयीन विभाग प्रमुख / अन्य विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी कृपया लक्ष द्यावे.



Scanned with CamScanner

(अकरा) सेवानिवृत्त राजपत्रित अधिकाऱ्यांच्या माहे मे-२०२१ च्या सेवानिवृत्ती वेतनातून दोन दिवसांचे निवृत्तीवेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्याबाबत संबंधित सेवानिवृत्ती वेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी उचित कार्यवाही करावी.

४. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांनी उपरोक्त परि.४ (सहा) व (सात) मध्ये उल्लेख केलेल्या देणग्या स्वीकारुन/प्राप्त झाल्याची खातरजमा करुन संबंधितांना एकत्रित पोचपावती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२१०५०७१५५१३८८१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=c97a9d6b23c341dd bfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2021.05.07 16:00:08 +05'30'

(टि. वा. करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद/ विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, राजभवन, मुंबई - ४०००३५
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
६. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.
११. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई - ४०० ०३२
१२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई - ४०० ०३२
१३. उप सचिव (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग
१४. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी
१५. प्रबंधक उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१६. प्रबंधक उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१७. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२०. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
२१. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, औरंगाबाद, नागपूर
२२. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयत्ता महाराष्ट्र-१, मुंबई,
२३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-२, नागपूर,
२४. सर्व अधिदान व लेखा अधिकारी कार्यालये
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य



Scanned with CamScanner

२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रकास प्रसिद्धी देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

२७. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

२८. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका

२९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३०. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती)

३१. राज्यातील सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक

३२. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य

३३. निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मंबई-३२.

........................



Scanned with CamScanner

## <u>अनुमतीपत्र / हरकत पत्र</u>

मी, श्री./श्रीमती/कुमारी ........................................................ आपल्या विभागात / कार्यालयात ......................... पदावर कार्यरत आहे.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव झाल्यामुळे गंभीर परिस्थिती उद्भवलेली असून, या आपत्तीच्या निवारणाकरिता राज्य शासनामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी, राज्य शासनास मदत म्हणून माहे मे, २०२१ च्या माझ्या वेतनातून एक/दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्यास मी इच्छुक आहे.

विभागातील/कार्यालयातील रोख कार्यासन व रोखपाल यांनी माझ्या मे २०२१ च्या देय वेतनातून एक/दोन दिवसांचे वेतन कपात करून घेण्यास माझी सहमती आहे.

आपला / आपली,

स्थळ:-

दिनांक:-

( )

अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम



Scanned with CamScanner

आयकर प्रमाणपत्राचा नमुना खालील प्रमाणे :-

## परिशिष्ट-अ

## प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी.................जे/जी............ विभागात/कार्यालयात .............पदावर कार्यरत आहेत, त्यांनी " मुख्यमंत्री सहायता निधीसाठी "रु.................../- (अक्षरी रुपये......................) एवढी देणगी दिली असून ही देणगी आयकर अधिनियम, १९६१ कलम ८० (ग)(२) (तीन एच एफ) खाली १०० टक्के सुटीस पात्र आहे.

स्थळ: विभागप्रमुख /कार्यालय प्रगुख /आहरण व संवितरण अधिकारी
दिनांक:- यांची सही व शिक्का



Scanned with CamScanner

## परिशिष्ट-ब

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशिल

### प्रमाणपत्राचा नमुना

कार्यालयाचे नाव व पत्ता :-

| अ.क्र. | आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व संपूर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (रूपये) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का



Scanned with CamScanner

## परिशिष्ट-क

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशिल

### प्रमाणपत्राचा नमुना

जिल्हाधिकारी कार्यालय:-

| अ.क्र. | देणगीदाराचे पुर्ण नाव व संपुर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (रूपये) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का

*******************



Scanned with CamScanner